क्रमांक .164.7/2021
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र
मुंबई यांचे कार्यालय
धर्मादाय आयुक्त भवन, ३ रा
८३, डा. अॅनी बेसंट रोड
वरळी, मुंबई ४०० ०१८

**कार्यालयीन परिपत्रक क्र.** 585 **दिनांक.**06/04/2021

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की,राज्यातील काही धर्मादाय रुग्णालयांबाबत तोंडी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत की, मा. उच्च न्यायालयाच्या योजनेखालील निर्धन व दुर्बल घटकातील रुग्ण रुग्णालयांमधे उपचारासाठी गेले असता 'बेड उपलब्ध नाही' असे सांगण्यात येते व पात्र रुग्णास योजनेचा लाभ घेता येत नाही, त्यामुळे एकंदरीत मा. उच्च न्यायालयाच्या योजनेचा भंग होत आहे,असे दिसून येते.

तरी सदर परिपत्रकाव्दारे राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांना असे निर्देश देण्यात येतात की, रुग्णालयामधे मा. उच्च न्यायालयाच्या योजनेप्रमाणे पात्र रुग्णास योग्य ती सुविधा न दिल्यास सबंधित रुग्णालयाविरुद्ध रुग्णालय योजनेचा भंग केल्याबाबत योग्य ती कारवाई करण्यात येईल व सदर रुग्णालयास शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सुविधा काढुन घेणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पुढील कार्यवाहीकरीता सादर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

S.V. Patil
6.4.2021

(प्र) धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:
धर्मादाय सहआयुक्त,
बृहन्मुंबई/पुणे/कोल्हापूर/नाशिक/औरंगाबाद/लातूर/नागपूर/अमरावती.
धर्मादाय उपआयुक्त,
ठाणे/अहमदनगर/सांगली/सोलापूर/जळगाव/नांदेड/अकोला/बीड.
सहायक धर्मादाय आयुक्त,
रायगड/पालघर/सातारा/धुळे/नंदुरबार/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/जालना/परभणी/हिंगोली/
उस्मानाबाद/वर्धा/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/गोंदिया/वाशिम/बुलढाणा/यवतमाळ

प्रत:
१.कार्यालयीन आदेशधारणी.
२.रुग्णालय शाखा (मुख्यालय)
३.संगणक शाखा (मुख्यालय)